जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
लोकमत

# क्रीडा वसतिगृहाचे उद्या उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसरात उभारण्यात आलेल्या क्रीडा वसतिगृह इमारतीचे भूमिपूजन वैद्यकीय शिक्षणमंत्री तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते उद्या, सोमवारी होणार आहे. विद्यापीठातील क्रीडा पॅव्हेलियनजवळ सकाळी ११ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

जनसंपर्क कक्ष

11 FEB 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी, अभ्यासकांनी घेतले विविध तारका समूहाचे दर्शन

## पन्हाळा केंद्रात अवकाश निरीक्षणाला प्रतिसाद

**सकाळ वृत्तसेवा**

पन्हाळा, ता. १० : अथांग पसरलेल्या आकाशातील ग्रह, तारे, विविध तारकांचे समूह, आकाशगंगा यांसह आकाशात वेळोवेळी घडणारे बदल याची शास्त्रशुद्ध माहिती अवकाश अभ्यासक आणि विद्यार्थ्यांनी शुक्रवारी करून घेतली. शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील संशोधन केंद्रामध्ये हा अवकाश निरीक्षण कार्यक्रम आयोजित केला होता.

अमावास्या असल्याने आकाश निरीक्षणात कोणताही अडथळा येत नाही. यामुळे रात्री अवकाश संशोधन केंद्रातर्फे याचे आयोजन केले होते. या उपक्रमात विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले. त्यांनी येथील १२ इंची



पन्हाळा : निमजागा माळावर असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रामध्ये दुर्बिणेच्या सहाय्याने अवकाश निरीक्षण करताना विद्यार्थी अभ्यासक.

दुर्बिणेच्या सहाय्याने गुरू ग्रह व त्याच्या उपग्रहांचे निरीक्षण केले. त्याचबरोबर त्यांना विविध नेबुलेसुद्धा दाखवण्यात आले. आकाश निरीक्षण कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान, गणित विभागाचे विद्यार्थी, टेक्नॉलॉजी विभागातील शिक्षक सहभागी झाले होते. कोल्हापूर, पन्हाळा, पेठवडगाव आणि परिसरातून नागरिक व मुलांनी याचा लाभ घेतला. मोबाइलच्या विविध ॲपद्वारे आकाशातील ग्रह, नक्षत्रे व राशी कशा ओळखायच्या, याचे मार्गदर्शन अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
महासत्ता

# अवकाश निरीक्षणाला उत्साही प्रतिसाद

कोल्हापूर, ता. १० (प्रतिनिधी)-

........................

शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये शुक्रवारी रात्री आयोजित आकाश निरीक्षण उपक्रमाला जिज्ञासू नागरिक, विद्यार्थी यांचा उत्साही प्रतिसाद लाभला.



अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी उपस्थितांना खगोलीय माहिती दिली.

या निरीक्षणावेळी उपस्थितांना १२ इंची दुर्बिणीच्या साह्याने गुरु ग्रह आणि त्याचे उपग्रह पाहता आले. त्याच बरोबर विविध नेब्युला दाखवण्यात आले. या आकाश निरीक्षण कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान आणि गणित विभागाचे विद्यार्थी, टेक्नॉलॉजी विभागातील शिक्षकांनी उपस्थिती लावली. तसेच, कोल्हापूर, पन्हाळा, पेठवडगाव आणि जवळपासच्या परिसरातून नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेतला.

1 1 FEB 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आकाश निरीक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामधील आयोजित आकाश निरीक्षण उपक्रमाला जिज्ञासू नागरिक, विद्यार्थी यांचा उत्साही प्रतिसाद लाभला. अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी उपस्थितांना खगोलीय माहिती सविस्तर दिली.

आकाश निरीक्षणावेळी उपस्थितांना १२ इंची दुर्बिणीच्या साह्याने गुरु ग्रह आणि त्याचे उपग्रह पाहता आले. त्याच बरोबर विविध नेब्युला दाखवण्यात आले, ज्यामध्ये आकाशातील धूळ आणि हायड्रोजन वायू मोठ्या प्रमाणात असतात आणि त्यापासून नवीन ताऱ्यांची निर्मिती होते. विविध प्रकारचे तारका समूह, आकाशगंगा यांचे दुर्बिणीच्या सहाय्याने निरीक्षण करण्यात आले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रात आकाश निरीक्षण करताना विद्यार्थी, नागरिक.

या आकाश निरीक्षण कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान आणि गणित विभागाचे विद्यार्थी, टेक्नॉलॉजी विभागातील शिक्षक, कोल्हापूर, पन्हाळा, पेठवडगाव आणि जवळपासच्या परिसरातून नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेतला. उपस्थितांना मोबाईलमधील विविध ॲपद्वारे आकाशातील ग्रह, नक्षत्रे आणि राशी कशा ओळखायचे याचेसुद्धा मार्गदर्शन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश निरीक्षणास प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये शुक्रवारी रात्री आयोजित आकाश निरीक्षण उपक्रमाला जिज्ञासू नागरिक, विद्यार्थी यांचा उत्साही प्रतिसाद लाभला. अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी उपस्थितांना खगोलीय माहिती दिली.

या निरीक्षणावेळी उपस्थितांना १२ इंची दुर्बिणीच्या साह्याने गुरु ग्रह आणि त्याचे उपग्रह पाहता आले. त्याच बरोबर विविध नेब्युला दाखवण्यात आले, ज्यामध्ये आकाशातील धूळ आणि हायड्रोजन वायू मोठ्या प्रमाणात असतात आणि त्या पासून नवीन ताऱ्यांची निर्मिती होत असते. विविध प्रकारचे तारका समूह, आकाशगंगा यांचे दुर्बिणीच्या साह्याने निरीक्षण करण्यात आले. या आकाश निरीक्षण कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान आणि गणित विभागाचे विद्यार्थी, टेक्नॉलॉजी विभागातील शिक्षकांनी उपस्थिती लावली. उपस्थित नागरिकांना मोबाइलच्या विविध ॲप द्वारे आकाशातील ग्रह, नक्षत्रे आणि राशी कशा ओळखायचे याचे सुद्धा मार्गदर्शन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
सकाळ

# विद्यापीठाच्या अवकाश निरीक्षणाला प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये शुक्रवारी रात्री आयोजित आकाश निरीक्षण उपक्रमाला जिज्ञासू नागरिक, विद्यार्थी यांचा उत्साही प्रतिसाद लाभला. अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी खगोलीय माहिती दिली. या निरीक्षणावेळी १२ इंची दुर्बिणीच्या साहाय्याने गुरू ग्रह आणि त्याचे उपग्रह पाहता आले. त्याचबरोबर विविध नेब्युला दाखवण्यात आले. विविध प्रकारचे तारका समूह, आकाशगंगा यांचे दुर्बिणीच्या साहाय्याने निरीक्षण करण्यात आले. या आकाश निरीक्षण कार्यक्रमास विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान आणि गणित विभागाचे विद्यार्थी, टेक्नॉलॉजी विभागातील शिक्षकांनी उपस्थिती लावली. तसेच कोल्हापूर, पन्हाळा, पेठवडगाव आणि जवळपासच्या परिसरातून नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेतला.

1 1 FEB 2024
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशनच्या संचालकपदी डॉ. सागर डेळेकर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजिसच्या संचालकपदी रसायनशास्त्र अधिविभागातील शिक्षक तथा संशोधक प्रा. डॉ. सागर डेळेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी त्यांना नियुक्तीबाबतचे पत्र प्रदान केले. प्रा. डेळेकर रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक आहेत. त्यांना विविध संशोधन मानांकन, फेलोशिप व पुरस्कार मिळाले आहेत. अधिसभा सदस्य, अभ्यास मंडळ, संशोधन समितीवर सदस्य म्हणून काम केले आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार यांच्यासह अधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
सकाळ

# प्रा. डॉ. सागर डेळेकर यांची नियुक्ती


डॉ. सागर डेळेकर

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजिसच्या संचालकपदी रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. सागर डेळेकर यांची नियुक्ती करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्य हस्ते त्यांना नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले. डॉ. डेळेकर करवीर तालुक्यातील कुरुकली येथील आहेत. भोगावती कॉलेजमधून त्यांनी पदवीचे शिक्षण घेतले. पुढे शिवाजी विद्यापीठात एमएस्सी पूर्ण करून 'सॉलिड मटेरियल्स' या विषयात पीएच.डी. संपादन केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
तरुण भारत

# सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशनच्या संचालकपदी डॉ. सागर डेळेकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर



इनोव्हेशन, इनक्युबेशन अॅन्ड लिंकेजिसच्या संचालकपदी रसायनशास्त्र अधिविभागातील शिक्षक तथा संशोधक डॉ. सागर डेळेकर यांची नियुक्ती केली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, अधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
11 FEB 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडा क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप नको

■ क्रीडा पत्रकार शारदा उग्रा यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना क्रीडा पत्रकार शारदा उग्रा.

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारताला क्रीडा क्षेत्रात मोठी संधी आहे. येथील खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता आहे. क्रीडा क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप कमी झाल्यास भारताचे या क्षेत्रातील भवितव्य उज्वल आहे, असे प्रतिपादन क्रीडा पत्रकार शारदा उग्रा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानात 'क्रीडा पत्रकारिता' विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर होते. जागतिक बँकेच्या अधिकारी रेक्सॉनी हकीम यांची प्रमुख उपस्थिती होती.

शारदा उग्रा म्हणाल्या, गेल्या काही वर्षात भारतातील खेडाळूंकडून चांगला खेळ होत आहे. केवळ क्रिकेट म्हणजे संपूर्ण क्रीडा विश्व नाही. इतर खेळातील खेळाडूंना उत्तम सुविधा दिल्या पाहिजेत. स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीवर सातत्याने स्पर्धांचे आयोजन करून खेळाडूंना प्रोत्साहित केले पाहिजे. यातून चांगले खेळाडू घडतील आणि ते देशासाठी विविध पदके आणतील. क्रीडा क्षेत्रात वाढता राजकीय हस्तक्षेप चिंतेचा विषय आहे. राजकीय हस्तक्षेप कमी झाला आणि संघटनात्मक पातळीवरी निर्णयात पारदर्शकता आल्यास भारतीय क्रीडा क्षेत्राला अजून चांगले दिवस येतील. मात्र, यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी. क्रीडा पत्रकारांनी वस्तुस्थिती मांडण्यावर विशेष भर द्यावा. इतरांपेक्षा वेगळी माहिती मिळविण्यावर पत्रकारांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे. यातून नवीन विषय आणि दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होईल,असे सांगितले. तसेच नवी दिल्ली येथे महिला कुस्तीपटूंनी केलेल्या आंदोलनाचा खेळावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. एखाद्या महिला खेळाडूवर अन्याय होत असेल तर तिला न्यायही मिळाला पाहिजे. देशात न्याय व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षस्थानावरून पारेकर यांनी पत्रकारितेतील बदलांबद्दल माहिती दिली. प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. पाहुण्याचे स्वागत डॉ. सुमेधा साळुंखे आणि डॉ. प्रसाद ठाकूर यांनी केले. परिचय साईसिमरन घाशी यांनी करून दिला. सूत्रसंचालन मेघा मोहिते यांनी केले. आभार मेलिना कालीचूर्ण यांनी मानले. यावेळी डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. नंदा पारेकर, संजय घोडावत विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख जयप्रकाश पाटील, डॉ. राजेंद्र भस्मे, सुचय खोपडे, किरण पाटील, बृहस्पती शिंदे, मनिषा शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
तरुण भारत

# सी. व्ही. रमन आयडिएशन क्लबच्या वतीने व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात मंगळवार १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता 'दक्षिण कोरियामधील उच्च शिक्षणाच्या संधी' या विषयावर डॉ. विनायक पारळे यांचे व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानाचा लाभ सर्व विद्यार्थी, संशोधक तसेच प्राध्यापकांनी घ्यावा असे आवाहन, नॅनोसायन्स अधिविभागाचे संचालक डॉ. के. के. शर्मा यांनी केले आहे.

11 FEB 2024
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुढारी

# विद्यापीठात मंगळवारी डॉ. पारळे यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील नॅनोसायन्स अधिविभागामधील सर सी. व्ही. रमन आयडिएशन क्लबच्या वतीने मंगळवारी (दि.१३) सकाळी ११ वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात 'दक्षिण कोरियामधील उच्च शिक्षणाच्या संधी' या विषयावर डॉ. विनायक पारळे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
तरुण भारत

# लोकपरंपरेतील स्त्रीविद्रोहीचे पुनर्वाचन हवे : डॉ. भवाळकर

कोल्हापूर : लोकपरंपरेतील स्त्रीविद्रोहाचे पुनर्वाचन गरजेचे आहे, असे मत डॉ. तारा भवाळकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. तारा भवाळकर लिखित 'सीतायन' पुस्तकावरील मुक्त संवाद कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रास्ताविक कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले पाहुण्यांचे स्वागत केले. परिचय मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी करून दिला. सुत्रसंचालन व आभार सुस्मिता खुटाळे यांनी मानले. यावेळी प्रा. किसनराव कुराडे, दशरथ पारेकर, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. अविनाश सप्रे, डॉ. माया पंडित, प्रा. सुनिलकुमार लवटे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय वेबिनार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागामध्ये १३ ते १५ फेब्रुवारीला इलेक्ट्रॉनिक वेस्ट अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे. उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या वेबीनारसाठी ग्रीस सरकारच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाउ, डॉ. सिहम कफाफी व अशोक नलावडे मार्गदर्शन करणार आहेत.

1 1 FEB 2024
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुढारी

# विद्यापीठात २७ रोजी आळिंबी प्रशिक्षण कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एसयूके रिसर्च अँड डेवलपमेंट फाऊंडेशन, अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभाग व अखिल भारतीय संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत धिंगरी आळिंबी (ओस्टर मशरूम) लागवड व प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणामध्ये कृषी महाविद्यालय पुणे येथील डॉ. बाबूराव चिरमे, डॉ. अशोक जाधव, नामदेव देसाई हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. मार्गदर्शकांकडून धिंगरी आळिंबी लागवडीबाबतचे तांत्रिकरीत्या व प्रात्यक्षिक स्वरूपामध्ये प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अनुसूचित जातीच्या ५० प्रशिक्षनार्थींना आळिंबी लागवडीचे प्राथमिक स्तरावर वापरण्यात येईल असे किट दिले जाईल. प्रशिक्षणास जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी नोंदणी करण्याचे आवाहन संचालक डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. पी. डी. राऊत, प्रा. डॉ. पी. डी. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
पुण्यनगरी

# धिंगरी आळिंबी प्रशिक्षणाचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत धिंगरी अळिंबी (ओस्टर मशरूम) लागवड व प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन व अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभाग तसेच अखिल भारतीय संशोधन केंद्र, कृषि महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकाकडून धिंगरी अळिंबी लागवडीबाबतचे तांत्रिकरित्या व प्रात्यक्षिक स्वरूपामध्ये प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2024
तरुण भारत

# विद्यापीठात २७ फेब्रुवारीला धिंगरी, अळीबी लागवड प्रशिक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत धिंगरी अळीबी (ओस्टर मशरूम) लागवड व प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. एसयूके रिसर्च अँड डेवलपमेंट फाऊंडेशन व अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभाग तसेच पुणे अखिल भारतीय संशोधन केंद्र, कृषि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे. तज्ज्ञ मार्गदर्शक धिंगरी अळीबी लागवडीबाबत तांत्रिकरीत्या व प्रात्यक्षिक स्वरूपामध्ये प्रशिक्षण देणार आहेत.